५१ वर्षांची परंपरा
ठाकूर लोणची
(सर्वत्र उपलब्ध)
ठाकूर आणि मंडळी
१५५, टी.एच. कटारीया मार्ग, माहीम, मुंबई ४०००१६

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

ISO 9001:2000

वर्ष : २० अंक : २२२ ● मुंबई, मंगळवार २ सप्टेंबर २००८ ● (पृष्ठे १२) ● मूल्य : २.५० रुपये ● www.saamana.com

संपादक : बाळ ठाकरे



## गणेश उपासनेचा बीजमंत्र!

यंदा लालबागच्या राजाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. लालबागच्या राजाची स्थापना १९३४ साली करण्यात आली तीच मुळी नवसाने. सध्या अस्तित्वात असलेली मंडई निर्माण होण्यासाठी कोळी व इतर व्यापारी बंधूंनी नवस केला व गणराया नवसाला पावला म्हणून नवसाला पावणारा लालबागचा राजा म्हणून 'श्री'ची मूर्ती प्रसिद्ध झाली.



अष्टविनायक गणपतीचा वास्तुशास्त्रात विचार करता पालीच्या बल्लाळेश्वराची दगडी सिंहासनावर तीन फूट उंचीची मूर्ती पूर्वाभिमुख असून डाव्या सोंडेची आहे. महाडच्या 'श्रीवरद विनायक'चे मंदिर पूर्वाभिमुख आहे, मूर्ती बैठी व डाव्या सोंडेची आहे. थेऊरच्या 'श्री चिंतामणी'च्या मंदिराचा महादरवाजा उत्तराभिमुख आहे. 'श्री चिंतामणी' डाव्या सोंडेचा असून पूर्वाभिमुख आहे व पद्मासनात आहे. मोरगावच्या 'श्री मयुरेश्वरा'ची मूर्ती बैठी, डाव्या सोंडेची व उत्तराभिमुख आहे. सिद्धटेकी असलेली 'श्री सिद्धिविनायका'ची मूर्ती स्वयंभू आहे. ती तीन फूट उंच असून उत्तराभिमुखी गजमुखी आहे. सोंड उजवीकडे असल्यामुळे सोवळे कडक आहे. रांजणगावच्या 'श्री महागणपती'चे मंदिर पूर्वाभिमुख असून मंदिरात दिशासाधन केले आहे. त्यामुळे उत्तरायनात व दक्षिणायनात मध्यान्हकाळी गणेशाच्या मूर्तींवर सूर्यकिरणे पडतात. ओझरच्या 'श्री विघ्नेश्वरा'चे अष्टविनायकात फार मानाचे स्थान आहे. 'श्री विघ्नेश्वर विनायका'ची मूर्ती पूर्वाभिमुख आहे. लेण्याद्रीच्या 'श्री गिरिजात्मका'ची मूर्ती दक्षिणाभिमुख आहे. त्याचबरोबर लालबागच्या राजाची मूर्ती पश्चिमाभिमुख आहे. अष्टविनायकांपैकी कोणी पूर्व, दक्षिण, उत्तराभिमुख मूर्ती आहेत. तरीदेखील या सर्व वास्तूंमध्ये एक प्रकारची शुभ वैश्विक ऊर्जा आहे. त्याचे मूळ कारण म्हणजे 'महागणपती' साक्षात 'ओम'. या अष्टविनायक मंदिरातील सर्व गाभाऱ्यातील वैश्विक शुभलहरी आरएफआय या उपकरणाद्वारे मोजल्या आहेत. या वैश्वक शुभलहरींची स्पंदने जेवढी अष्टविनायक गाभाऱ्यामध्ये आढळली तेवढीच शुभस्पंदने मला ११ दिवस लालबागच्या श्रींच्या मूर्तीजवळ आढळली. तेव्हाच श्रींचे नवसाला पावणे याचे रहस्य कळले.

गणेश अथर्वशीर्षात गणेशाचे सविस्तरपणे वर्णन आहे. एकदंत गणेशाचे ज्ञान आम्ही प्राप्त करतो. वक्रतुंड गणेशाचे आम्ही ध्यान करतो. तो दंतयुक्त देव आम्हास त्याच्या भक्तीची प्रेरणा देवो. 'एकदंत', 'चतुर्हस्त' तसेच 'पाश, अंकुश, रद आणि वरद ही चार आयुधे धारण करणाऱ्या', 'मूषकध्वज', 'आरक्तवर्णीय, 'लंबोदर', 'शूर्पकर्ण', 'आरक्त वस्त्रधारी' आरक्त गंध शरीरावर चर्चिलेल्या, आरक्त पुष्पांनी पूजिलेल्या श्री गणेशाचे आम्ही ध्यान करतो.'

प्राचीन उपासना साहित्यातील मंत्राचे वैदिक मंत्र, तांत्रिक मंत्र, बीजमंत्र, पौराणिक मंत्र आणि नाम मंत्र असे पाच प्रमुख प्रकार मानले जातात. यापैकी बीजमंत्र हे तांत्रिक उपासनेशी आणि तत्संबंधित मंत्रशास्त्राशी संबंधित असून असे अनेक बीज मंत्र गणेश अथर्वशीर्षात आढळतात. तंत्रशास्त्रात देवतांना प्रसन्न करण्यासाठी 'बीजमंत्र' आवश्यक आणि महत्त्वाचे मानीत असून त्यामध्ये इष्ट देवतांना प्रसन्न करण्याचे सामर्थ्य आहे असे मानतात.

वैदिक वाङ्मयातील 'ॐ' अथवा 'प्रणव' सर्वाधिक प्राचीन बीजमंत्र असून त्याच्या जपाने त्वरित मोक्षप्राप्ती होत असल्याचे तेथे सांगितले आहे. अथर्वशीर्षात गणेश उपासनेचा निम्नलिखित बीजमंत्र आढळतो.

ॐ गं गणपतये नमः।

(ॐ गं स्वरूपी गणपतीला नमस्कार असो) या बीजमंत्राच्या उच्चारण पद्धतिशास्त्राला गणेश अथर्वशीर्षात 'गणेशविद्या' म्हटले आहे. गणाच्या प्रारंभीच्या 'ग' काराच्या उच्चारानंतर वर्णाच्या प्रारंभीच्या 'अ' काराचा उच्चार करावा. त्यानंतर अर्धचंद्राकार अनुस्वार उच्चारावा. तत्पूर्वी ॐकार उच्चारावा. 'हे गणेशा, असे तुझ्या मंत्राचे स्वरूप आहे. प्रथम 'ग'कार, नंतर 'अ'कार, शेवटी सानुनासिक अनुस्वार आणि त्याचे नंतर एकत्रीच्या रणात्मक उच्चारण अशी ही गणेशविद्या आहे. तिचा गणक हा ऋषी, निचृद् गायत्री हा छंद आणि गणपती ही देवता आहे।

– तुषार य. सावडावकर